*Appendix I (v)*, **(Vide Article - 1.05)**

**वनसंरक्षणाच्या सुधारित मापदंडाना मान्यता देणे बाबत**
**महाराष्ट्र शासन,**
**महसूल व वनविभाग**
शासन निर्णय क्रमांक : टिआरएस-०६/२००१/प्र.क्र.२०९/फ-६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८/५/२००३

**<u>शासन निर्णय</u>**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानी जनहित याचिका क्रमांक १२७७/२००० मध्ये असे निर्देश दिलेत की वनविभागातील विविध परिपत्रक आणि स्थाई आदेशानुसार वनसंरक्षण कार्याचे मापदंड परिस्थितीशी अनुरूप नसल्याने सुधारित करण्यात यावेत. न्यायालयाच्या निर्देशानुसार वनसंरक्षण कार्याचा आढावा घेवून सुधारीत मापदंड निश्चित करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांचे कार्यालयात एका समितीचे गठन केले. सदर समितीस खालील बाबींचा आढावा घेवून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेत.

- संरक्षणविषयक सध्याचे मापदंड गैरवाजवी आहेत काय व त्यात सुसूत्रिकरण करण्याची आवश्यक आहे काय याचा अभ्यास करणे
- पर्यवेक्षण आणि संनियंत्रण पध्दतीमध्ये सुधारणा प्रस्तावित करणे, जेणे करून क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांना या पध्दतीने चांगल्या प्रकारे अनुपालन करणे शक्य होईल.
- क्षेत्रीय तपासणीमध्ये गुणात्मक व संख्यात्मक सुधारणा प्रस्तावित करणे व संनियंत्रणाची पध्दत प्रस्तावित करणे
- वनगुन्हे प्रकरणाचा चौकशीचा दर्जा उंचावण्याबाबत व ते अधिक जलद गतीने निकाली काढण्याच्या पध्दतीबाबत उपाय सुचविणे
- सध्याची दक्षता घटके अधिक सक्षम करण्यासाठी उपाय सुचविणे
- नियतक्षेत्र तपासणीच्या पध्दतीचा व वनगुन्हे शोधुन काढण्याच्या पध्दतीत सुधारणा करणे

उपरोक्त बाबी विचारात घेवून समितीचा अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी स्विकृतीच्या शिफारशीसह शासनास सादर केला. हा अहवाल शासनाचे विचाराधीन होता.

रिट याचिका क्रमांक १२७७/२००० प्रकरणी न्यायालयाने दिलेले निर्देश, त्यानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल. सदर अहवालास प्रधान मुख्य वनसंरक्षक,

महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कळविलेली स्विकृती लक्षात घेवून समितीने वनसंरक्षणाबाबत प्रस्तावित केलेल्या खालील सुधारित मापदंडांना शासन मान्यता देण्यात येत आहे. या मापदंडाचे काटेकोरपणे पालन करण्याची खबरदारी विविध स्तरावर वन अधिकारी/ कर्मचारी यांनी घ्यावी.

**वनसंरक्षण कार्याचे सुधारित मापदंड**

**१) नियतक्षेत्राची वर्गवारी**

वनसंरक्षणाच्या दृष्टीने नियतक्षेत्राची वर्गवारी खालील प्रमाणे करण्यांत यावी.

| अ. क्र. | वार्षिक मापदंड | सर्वसाधारण नियतक्षेत्र | संवेदनशिल नियतक्षेत्र | अतिसंवेदनशिल नियतक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | अवैध वृक्षतोड | | | |
| | (अ) वृक्षांची संख्या | | | |
| | साग | २५ झाडां पेक्षा कमी | २५-५० | ५० चे वर |
| | सागेत्तर | १०० झाडांपेक्षा कमी | १००-२०० | २०० चे वर |
| | (ब) तोडीतील वृक्षांची किंमत | रू. १ लाख पेक्षा कमी | रू.१ ते २ लाख | रू.२ लाख चे वर |
| | (क) वनगुन्ह्यांची संख्या | १५ पेक्षा कमी | १५-२५ पर्यंत | २५ चे वर |
| २. | वनवणवा जळीत क्षेत्र | २५ टक्के पेक्षा कमी | २५ ते ५० टक्के पर्यंत | ५० टक्केचे वर |
| ३. | अवैध चराई | ३ पेक्षा कमी | ३-५ पर्यंत | ५ चे वर |
| ४. | अवैध शिकार | ज्या नियतक्षेत्रात अवैध शिकारीच्या घटना घडतात अशी सर्व नियतक्षेत्रे संवेदनशिल वर्गवारीत येतात. | | |

- प्रादेशिक वन विभागालगतच्या संरक्षित क्षेत्रातील (म्हणजे अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान) सर्व नियतक्षेत्रे
- ज्या नियतक्षेत्रात वन्यप्राण्यांचे अस्तित्व आहे व गावाजवळील आहे व जी गावे अवैध शिकारीसाठी माहित आहे अशी नियतक्षेत्रे संवेदनशिल समजण्यात यावीत
- अतिक्रमणासाठी नियतक्षेत्राची वर्गवारी करण्यास त्या नियतक्षेत्रातील अधिक्रमणाची व्याप्ती आणि अतिक्रमण करण्याची लोकांची प्रवृत्ती विचारात घेवून संवेदनशिलता-अतिसंवेदनशिलता निश्चित करण्यात यावी.
- नियतक्षेत्राची वर्गवारी करण्यास वनसंरक्षक हे जबाबदार राहतील. त्यासाठी ते मागील ३ वर्षातील वनगुन्ह्यांचा आढावा घेवून उपवनसंरक्षकांशी विचार विनिमय करतील. नियतक्षेत्राची वर्गवारी कॅलेंडर वर्षाच्या सुरूवातीस करण्यात यावी. ही वर्गवारी ३

वर्षांकरिता कायम राहील. त्यानंतर आवश्यकतेनुसार पुनर्विलोकन करण्यांत यावे. नियतक्षेत्राची वर्गवारीनुसार यादी मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) यांना सादर करावी व वर्गवारीबाबतची माहिती वनरक्षक स्तरापर्यंत अवगत करण्यात यावी.

**२) नियतक्षेत्र तपासणी**

- वनपरिक्षेत्र अधिकारी हे प्रत्येक महिन्यात कमीत कमी एका नियतक्षेत्राची तपासणी करतील व उपवनसंरक्षकंना अहवाल सादर करतील
- उपवनसंरक्षक हे त्यांच्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांना नियतक्षेत्र तपासणीचा वार्षिक कार्यक्रम निर्धारित करून देतील.
- नियतक्षेत्रे तपासणीचा कार्यक्रम योग्य प्रकारे राबविण्यात येत आहे याची खात्री करण्यास सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक, वनसंरक्षक हे नियमितपणे भेटी देवून नमूना तपासणी करून कनिष्ट कर्मचारी/ अधिकारी यांनी नियतक्षेत्र तपासणीचे कार्य योग्य रितीने केलेले असून अवैध वृक्षतोडीच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत याची खात्री करतील.

**३) आरागिरणी तपासणी**

वन अधिकारी त्यांच्या नियमित जंगल गस्तीच्या वेळी आरागिरण्यांची तपासणी करून त्या ठिकाणी अवैध तोडीतील माल आढळल्यास नियमानुसार कार्यवाही करतील. आरागिरणी तपासणीचे मापदंड खालील प्रमाणे निश्चित करण्यात आले

| अ.क्र. | पद | आरागिरणी तपासणीचे मापदंड |
|---|---|---|
| १. | वनपरिक्षेत्र अधिकारी | दरमहा कमीत कमी १२ आरागिरण्यांची तपासणी, ज्यांच्या कार्यक्षेत्रात १२ पेक्षा कमी आरागिरण्यात आहेत अशा ठिकाणी सर्व आरागिरण्याची दरमहा तपासणी करावी |
| २. | सहा. वनसंरक्षक | दरमहा कमीत कमी ६ आरागिरण्यांची तपासणी |
| ३. | उपवनसंरक्षक | दरमहा कमीत कमी ४ आरागिरण्यांची तपासणी |
| ४. | वनसंरक्षक | दरमहा कमीत कमी २ आरागिरण्याची तपासणी |

- राज्यातील जिल्हा मुख्यालयी असलेल्या पुष्कळशा वनपरिक्षेत्रात आरागिरण्यांची संख्या जास्त आहे अशा आरागिरण्यांची तपासणी एक वनपरिक्षेत्र अधिकारी उपरोक्त मापदंडानुसार करू शकणार नाही, याकरिता वनसंरक्षकांनी विशेष कार्य वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याची नियुक्त करून अशा ठिकाणच्या सर्व आरागिरण्या कमीत कमी वर्षातून एकदा तपासल्या जातील याचे नियोजन करावे.

- उपरोक्त मापदंडानुसार कनिष्ठ वन अधिकाऱ्यांव्दारे आरागिरण्यांची दरमहा तपासणी होत आहे याची खात्री वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक (प्रा) करतील. आरागिरणी तपासणीचा त्रैमासिक अहवाल वनसंरक्षकांव्दारे मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) आणि वृत्ताच्या संबंधित नियंत्रक मुख्य वनसंरक्षकांना सादर करण्यात येईल.

**४) वनक्षेत्रातील दौऱ्याबाबतचे मापदंड**

वनसंरक्षणाकरिता सर्वसाधारणपणे वन अधिकाऱ्यांना करावयाच्या दौऱ्याचे व रात्रीच्या मुक्कामाचे मापदंड खालील प्रमाणे राहतील

| अ.क्र. | पद | दौऱ्याचे मापदंड |
|---|---|---|
| १ | वनपरिक्षेत्र अधिकारी | प्रतिवर्ष कमीत कमी २१० दिवस |
| २. | सहाय्यक वनसंरक्षक | प्रतिवर्ष कमीत कमी १८० दिवस |
| ३. | उपवनसंरक्षक | प्रतिवर्ष कमीत कमी १५० दिवस |
| ४. | विभागीय वन अधिकारी (दक्षता) | प्रतिवर्ष कमीत कमी १२० दिवस |
| ५. | वनरक्षक | प्रतिवर्ष कमीत कमी १२० दिवस |

**दिप :- एकूण दौऱ्याच्या दिवसापैकी कमीत कमी ७५ टक्के दिवसांकरिता अधिकाऱ्यांनी वनात रात्रीचा मुक्काम करणे अपेक्षित आहे.**

तथापी विविध वनगुन्ह्यांची व्याप्ती, अधिकाऱ्यांना विविध सभांकरिता उपस्थित राहण्याची बंधने आणि वनसंरक्षणाकरिता विविध स्तरावरील अधिकाऱ्यांच्या दौऱ्याची प्रत्यक्ष आवश्यकता इत्यादी बाबींचा सर्वकष विचार करून संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिनस्थ असलेल्या अधिकाऱ्यांनी प्रतिवर्ष किती दिवस दौरा करावा याची निश्चिती करण्यास मुभा राहील.

**५) नियतक्षेत्र खैरीयत अहवाल**

प्रत्येक नियतक्षेत्र वनरक्षकाने नियतक्षेत्र खैरीयत अहवाल संग्रही ठेवावा. दैनंदिन अवैध वृक्षतोडीच्या घटना व इतर वनगुन्हे वनरक्षक अशा अहवालात नोंदवतील. दरमहा ५ तारखेच्या दरम्यान नियतक्षेत्र वनरक्षक नियतक्षेत्र खैरीयत अहवाल वनपालांमार्फत वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यास सादर करतील. वनपरिक्षेत्र अधिकारी त्यांच्या वनपरिक्षेत्रातील सर्व नियतक्षेत्रांचे नियतक्षेत्र खैरीयत अहवाल दरमहा १० तारखेपर्यंत उपवनसंरक्षकांकडे सादर करतील.

**६) अवैध वृक्षतोडीचा तत्परतेने शोध घेणे**

वनसंरक्षणासाठी कार्यरत असणारा क्षेत्रीय कर्मचारी वर्ग, अवैध वृक्षतोडीच्या घटना निदर्शनास येताच त्याबाबतचे अहवाल त्यांच्या वरिष्ठांकडे सादर करीत असतात. मोठ्या प्रमाणावरील अवैध वृक्षतोडीच्या घटनांची तत्परतेने दखल घेवून अशा घटना पुन्हा घडणार नाहीत यासाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे महत्वाचे आहे, तसेच अशा घटनांबाबत वरिष्ठांना आणि शासनास अवगत करणे देखील महत्वाचे ठरते. यासाठी खालील प्रमाणे मापदंड निर्धारित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | घटनास्थळावरील अवैध वृक्षतोडीची किंमत | तपासणी अधिकाऱ्याचे पद | किती कालावधीत तपासणी पूर्ण करावी |
|---|---|---|---|
| १. | रू. ५००००/- पर्यंत | वनपरिक्षेत्र अधिकारी | माहिती मिळाल्यापासून ३ दिवसांचे आत |
| २. | रू.५००००/- ते २ लाख पर्यंत | सहा. वनसंरक्षक | माहिती मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत |
| ३. | रू. २ लाख ते ५ लाख पर्यंत | उपवनसंरक्षक | माहिती मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत |
| ४. | रू. ५.०० लाखाचे वर | वनसंरक्षक | माहिती मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत |

**(अवैध वृक्षतोडीची किंमत ही एका संनियतक्षेत्रातील १५ दिवसांचा कालावधीकरिता राहील)**

**७) वनगुन्ह्यांच्या नोंदीबाबत पध्दत**

सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार वनगुन्हा पुस्तिकेत वनगुन्ह्याच्या ३ प्रती असतात. वनगुन्हा नोंदविल्यानंतर एक प्रत मुळ प्रत म्हणून वनरक्षकाकडे राहते. दुसरी आणि तिसरी प्रत वनपाल आणि उपवनसंरक्षकांकडे सादर केली जाते. वनपालांकडे वनगुन्ह्यांची प्रत प्राप्त झाल्यानंतर ते वनगुन्ह्यांची नोंद रजिस्टरीमध्ये घेवून ती प्रत वनपरक्षित्र अधिकारी यांचेकडे पाठवितात. वनपालांकडून प्रत प्राप्त झाल्यानंतरच वनपरिक्षेत्राधिकाऱ्यास वनगुन्ह्याबाबतची माहिती होते. याकरिता असे सूचवितण्यात येते की वनगुन्हा पुस्तिकेत वनगुन्हा ४ प्रतीत राहील. चौथी प्रत वनरक्षकांव्दारे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडे सरळरित्या सादर केल्या जाईल. तथापि, विभागीय कार्यालयात सध्या शिल्लक असलेला ३ प्रतीतील वनगुन्हा पुस्तिकेचा साठा सध्याच्या पध्दतीप्रमाणे उपयोगात आणावा. हा साठा संपुष्टात आल्यानंतर नवीन साठ्यातील पुस्तिकेतील वनगुन्हा प्रपत्र ४ प्रतीत राहील यानुसार कार्यवाही करावी.

<u>**८) कार्यालयाची नियमित तपासणी**</u>

प्रलंबित वनगुन्हा प्रकरणे, नियतक्षेत्र तपासणी कार्यक्रमाची अंमलबजावणी,विविध अहवाल नियमित सादरीकरणेचा आढावा घेण्यासाठी विविध स्तरावरील अधिका-यांनी विविध पातळीवरील कार्यालयाची नियमित तपासणी करणे आवश्यक ठरते. यासाठी खालीलप्रमाणे मापदंड राहतील.

| अक्र | कार्यालयाचे नांव | तपासणी अधिकारी व मापदंड |
|---|---|---|
| १ | परिमंडळ कार्यालय | सहाय्यक वनसंरक्षकांनी ३ महिन्यातून एकदा तपासणी करावी. |
| २ | परिक्षेत्र कार्यालय | सहाय्यक वनसंरक्षकांनी त्यांना नेमून दिलेल्या वनपरिक्षेत्राची कार्यालये वर्षातून एकदा तपासावीत.<br>उपवनसंरक्षक विभागातील ३ वनपरिक्षेत्र कार्यालय एका वर्षात तपासतील.वनसंरक्षक/मुख्य वनसंरक्षक आपल्या वृत्तातील प्रत्येक विभागातील एका परिक्षेत्र कार्यालयाची वार्षिक तपसाणी करतील |
| ३ | विभागीय कार्यालय. | वनसंरक्षक प्रतिवर्ष वृत्तातील २ विभागीय कार्यालयाची तपासणी करतील. |

९) सद्यस्थितीत ज्या वनगुन्हयामध्ये वनउपजाची किंमत रुपये २०००/- पेक्षा जास्त असेल असेच वनगुन्हे न्यायालयात दाखल करण्यांत येतात.त्यामुळे मोठया प्रमाणावर प्रकरणे प्रलंबित राहतात. प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्यासाठी आतापासून ज्या वनगुन्हयामध्ये वनउपजाची किंमत १०,००० किंवा त्यापेक्षा अधिक असेल असेच प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यांत यावे, तथापी सराईत गुन्हेगारानी वनगुन्हे केल्यास किंवा वनगुन्हयामध्ये मोटारी वाहनांचा वापर झाल्यास असे सर्व प्रकरणी, वनोपजांची किंमत विचारात न घेता, न्यायप्रविष्ट करण्यांत यावी.

**१०) वनगुन्हा शोधकार्याचे मापदंड**

सध्या वनगुन्हयाचें स्वरुप कसेही असले तरी अशा सर्व वनगुन्हयांचा शोध वनपालांकडून करण्यांत येतो. या पदाच्या मर्यादा लक्षात घेता सर्वच वनगुन्हा प्रकरणांचे शोधकार्य या पदाकडे सोपविणे योग्य नाही. वनगुन्हा प्रकरणाचे स्वरुप/महत्व लक्षात घेवून शोधकार्याचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे. जेणेकरुन वनगुन्हा प्रकरणाचा लवकर

निपटारा चौकशीची प्रत राखुन करणे शक्य होईल. यासाठी खालील मापदंड निर्धारित करण्यांत येत आहे.

| अक्र | पद | शोधकार्याचे मापदंड |
|---|---|---|
| १ | वनपाल | रु.१००००/- पर्यंतची वनगुन्हा प्रकरणे |
| २ | वनपरिक्षेत्र अधिकारी | रु.१०००० ते २५०००/- पर्यंतची वनगुन्हा प्रकरणे |
| ३ | सहा. वनसंरक्षक | रु.२५०००/- वरील सर्व वनगुन्हा प्रकरणे आणि ज्या वनगुन्हयात यांत्रिक वाहने आणि वन्यजीव विषयक सर्व वनगुन्हा प्रकरणे |

उपरोक्त सर्व मापदंडांची अंमलबजावणी विविध स्तरावरील अधिकारी/कर्मचारी काटेकोरपणे करतील. याशिवाय वनसंरक्षणाबाबत शासनाने आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक,महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी यापूर्वी वेळोवेळी सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यापैकी जे मापदंड वरीलप्रमाणे सुधारीत करण्यांत आलेले आहेत त्याशिवाय इतर मानदंड यापुढेही कार्यान्वित राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

स्वाक्षरी/-

( म.सो. खंडारे.)
कक्ष अधिकारी
महसूल व वनविभाग

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर डॉ. बाबासाहेब आंबडेकर भवन, मिनरल एक्स प्लोरेशन कॉर्पोरेशन (एमपीसीएम) सेमितरी हिल,नागपूर.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर डॉ. बाबासाहेब आंबडेकर भवन, मिनरल एक्स प्लोरेशन कॉर्पोरेशन (एमपीसीएम) सेमितरी हिल,नागपूर.

अपर मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपूर

अपर मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य नागपूर

मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य नागपूर